**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**बुधवार, दिनांक १४ ऑगस्ट २०२४**

**ठळक बातम्या**

- **राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज ७८व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशवासियांना संबोधित करणार, उद्या मुख्य ध्वजारोहण पंतप्रधानांच्या हस्ते लाल किल्ल्यावर होणार संपन्न.**
- **स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांना शौर्य पदक, विशेष सेवा पदकं जाहीर-गडचिरोली जिल्हयातील १७ पोलिस अधिकारी आणि शिपायांना राष्ट्रपतींचे शौर्य पदक.**
- **'हर घर तिरंगा' अभियानाअंतर्गत अरुणाचल प्रदेशात सहा हजार फूट तिरंगा ध्वज घेऊन निघालेल्या रॅलीचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं कौतुक, विदर्भासह नागपुरात देखील अभियानाचा उत्साह.**
- **विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी हाच आमचा चेहरा असून, निवडणूकीनंतर सर्वसहमतीने मुख्यमंत्री ठरवण्यात येणार असल्याचं काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचं प्रतिपादन.**

****

राष्ट्रपति संबोधन

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशवासियांना संबोधित करणार आहेत. आकाशवाणीच्या देशभरातल्या सर्व केंद्रांवरुन तसंच दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून संध्याकाळी ७ वाजता हे भाषण आधी हिंदी आणि त्यानंतर इंग्रजी भाषेत प्रसारित केलं जाईल. त्यानंतर दूरदर्शनच्या प्रादेशिक वाहिन्यांवरून प्रादेशिक भाषांमध्ये राष्ट्रपतींचं भाषण प्रसारित होईल. आज रात्री साडे नऊ वाजता हे संबोधन आकाशवाणीवरुन प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित केलं जाईल.

संध्याकाळी सात वाजता राष्ट्रपतींचं संबोधन प्रसारित होणार असल्यानं आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र आज संध्याकाळी पावणे सात वाजता प्रसारित होईल.

स्वातंत्र्य दिन दिल्ली

७८ वा स्वातंत्र्य दिन उद्या देशभरात साजरा होणार असून दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी ध्वजारोहण करतील त्यानंतर ते देशाला संबोधित करतील. यंदाच्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याची संकल्पना 'विकसित भारत' अशी आहे. स्वातंत्र्य दिन सोहळ्यात सहभागी होण्यासाठी केंद्र सरकारनं देशभरातल्या विशेष पाहुण्यांना आमंत्रित केलं आहे. यामध्ये महाराष्ट्रातल्या १२३ हून अधिक व्यक्तिंचा समावेश आहे. यात विशेष आमंत्रितांसह महिला, युवक, शेतकरी, आदिवासी, क्षेत्रीय अधिकारी आणि विविध सरकारी योजनांचे लाभार्थी, MyGov स्वातंत्र्य दिन प्रश्नमंजुषेचे विजेते आणि नीति आयोगाच्या विशेष आमंत्रितांसह समाजातल्या विविध घटकांचा समावेश असेल.

विशेष सेवा पदकं

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांना शौर्य पदक, विशेष सेवा पदकं आज जाहीर झाली. यामध्ये राष्ट्रपती शौर्य पदक तेलंगणा पोलिस विभागातले मुख्य हवालदार चादूवू यदैया यांना जाहीर झालं आहे. याशिवाय २१३ जणांना शौर्य पदक जाहीर झालं आहे. यामध्ये राज्यातल्या १७ जणांचा समावेश आहे. ९४ जणांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झालं असून, यामध्ये राज्यातल्या चिरंजीव प्रसाद, राजेंद्र डहाळे, सतीश गोवेकर यांचा समावेश आहे. तर ७२९ जणांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक जाहीर झालं आहे. यामध्ये राज्यातल्या ३९ जणांचा समावेश आहे. नागपूरच्या लकडगंज पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असलेले अक्षय शुक्ला यांची देखील पोलीस पदकासाठी निवड झालेली आहे उल्लेखनीय बाब म्हणजे गेल्या वर्षीच्या गणतंत्र दिनाला देखील त्यांना राष्ट्रपतींच्या पोलीस पदकांने सन्मानित करण्यात आलं होतं. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय गृहमंत्रालयाने गडचिरोली जिल्ह्यातील १७ पोलिस अधिकारी आणि शिपायांना राष्ट्रपतींचे शौर्य पदक, तर एका अधिकाऱ्यास गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक जाहीर केले आहे. २०१७ ते २०२२ दरम्यान कापेवंचा-कवठाराम, मोरमेट्टा, नैनेर इत्यादी ठिकाणी झालेल्या चकमकीत पोलिसांनी ४ नक्षल्यांना कंठस्नान घातले होते. या चकमकीत दाखविलेल्या शौर्याची दखल घेऊन शासनाने या १७ पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शौर्यपदक जाहीर केले आहे. स्वातंत्यदिनाच्या पूर्वसंध्येला गडचिरोली पोलिस दलातील ४१ हवालदारानां सहायक फौजदारपदी, तर ५५ पोलिस नाईक अंमलदारांना हवालदारपदी पदोन्नती मिळाली आहे. पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी शौर्यपदक प्राप्त अधिकारी आणि शिपाई तसंच पदोन्नत कर्मचाऱ्यांचं अभिनंदन केलं आहे.

हर घर तिरंगा

'हर घर तिरंगा' अर्थात घरोघरी तिरंगा अभियाना अंतर्गत अरुणाचल प्रदेशात सहा हजार फूट तिरंगा ध्वज घेऊन निघालेल्या रॅलीचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केलं आहे. अरुणाचल प्रदेश ही देशभक्तीची भूमी असून राज्याच्या सांस्कृतिक वारशात ते स्पष्टपणे प्रतिबिंबित होतं, असं मोदींनी आपल्या समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. घरोघरी तिरंगा अभियानासाठी जनतेचा उत्साह पाहून आपल्याला आनंद होत असल्याचंही ते म्हणाले. हर घर तिरंगा मोहिमेनिमित्त देशभरात उत्साहाचं वातावरण असून, तिरंगा यात्रा, सेल्फी आणि तिरंगा रॅलींचा जल्लोष सुरू आहे. नागपूर विधान भवन इथं आकर्षक तिरंगी रोषणाई करण्यात आली आहे. याशिवाय सरकरी, खाजगी इमारती आणि घरांवर राष्ट्रध्वज लावण्यात आले आहेत. प्रसिद्ध विक्रमवीर शेफ विष्णू मनोहर यांनी 'हर घर तिरंगा' अभियानाबद्दल आवाहन केलं आहे - (होल्ड बाइट - ३१ सेकंद)

***(नमस्कार मी विष्णू मनोहर आणि तुम्हा सर्वांना 15 ऑगस्ट च्या खूप खूप शुभेच्छा. 15 ऑगस्ट हा आपला स्वातंत्र्य दिन आणि आपल्याला त्याचा अभिमान आहे. आणि यामुळेच गव्हर्मेंट ऑफ इंडिया ने एक अभियान चालवले आहे हर घर तिरंगा या अभियानाला आपण प्रतिसाद देत आणि आपण मनापासून काहीतरी करत आपल्या घरावर तिरंगा लहरवायचा आहे. आपल्या प्रतिष्ठानावर तिरंगा लावायचा आहे आणि 15 ऑगस्ट उत्साहात साजरा करायचा आहे. हर घर तिरंगा घर घर तिरंगा.***

*दरम्यान,* 'हर घर तिरंगा' उपक्रमात आज बुलढाणा जिल्हा प्रशासनातर्फे तिरंगा प्रभात फेरी काढण्यात आली. यात शहरातील सात शाळांतील दोन हजाराहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. जिजामाता प्रेक्षागार इथं जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी तिरंगा प्रभात फेरीला हिरवी झेंडी दाखविली.

स्वातंत्र्य दिनी

उद्या स्वातंत्र्य दिनी, राज्याचे उपमुख्यमंत्री आणि नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपूरच्या विभागीय आयुक्त कार्यालयात मुख्य ध्वजारोहण संपन्न होणार आहे. तर नागपूर महानगर पालिकेच्या मुख्यालयात सकाळी 08.05 मिनीटांनी आयुक्त आणि प्रशासक डॉ.अभिजित चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे.

डेंगू लस

भारतीय वैद्यकीय संशोधन परीषद ICMR आणि पॅनिशिया बायोटेक यांनी भारतात डेंग्यू आजाराच्या लसीच्या पहिल्या टप्प्यातील तिसरी अर्थात रुग्णांवरील प्रत्यक्ष चाचणी सुरू करण्याची घोषणा केली आहे. या महत्त्वाच्या चाचणीमुळे स्वदेशी निर्मित टेट्राव्हॅलेंट डेंग्यू लस,डेंगी ऑल या लसीच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन होऊ शकेल. पंडित भागवत दयाल शर्मा पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस रोहतक इथं आज या चाचणीतील पहिल्या सहभागीला लस देण्यात आली."या तिसऱ्या टप्प्यातील क्लिनिकल चाचणीची सुरुवात डेंग्यूविरुद्धच्या लढ्यात महत्त्वपूर्ण प्रगती दर्शवते. या सर्वव्यापी आजारापासून आपल्या नागरिकांचे संरक्षण करण्याची आमची बांधिलकी त्यातून प्रतिबिंबित होत असून लस संशोधन आणि विकासामध्ये भारताच्या क्षमतांना अधोरेखित करते," अशी प्रतिक्रिया केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री, जे.पी. नड्डा यांनी दिली.

चित्रपट सृष्टी पुरस्कारांची घोषणा

शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने चित्रपट सृष्टीसाठी पुरस्कारांची घोषणा आज सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. चित्रपती व्ही.शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांना जाहीर झाला आहे. तर राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना जाहीर झाला आहे. चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार लेखक, दिग्दर्शक तसेच अभिनेता दिग्पाल लांजेकर यांना जाहीर झाला आहे. तर राज कपूर विशेष योगदान पुरस्कार जेष्ठ लेखक, दिग्दर्शक संकलक एन.चंद्रा यांना जाहीर झाला आहे.

नाना पटोले

महाराष्ट्रातील शेतकरी, तरुण, गरीब व सर्व जाती धर्मांच्या लोकांना न्याय देण ही काँग्रेसची भूमिका आहे. त्यामुळं महाविकास आघाडी म्हणून विधानसभेच्या निवडणुकांना सामोरे जाणार आहोत. निवडणुकीनंतर सर्वसहमतीने मुख्यमंत्री ठरवू. महाराष्ट्राचा स्वाभिमान व महाराष्ट्र वाचविणे ही काँग्रेसची प्राथमिकता आहे, असं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. नागपूर इथं प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, युती सरकारने मुंबईसह महाराष्ट्र विकायला काढला आहे.विशिष्ट उद्योजकांना महत्वाच्या जमिनी कवडीमोल भावाने दिल्या जात असून महाराष्ट्राची लूट सुरु आहे असा आरोप नाना पटोले यांनी केला.

रमेश चेन्नीथला

राहुल गांधी यांच्या भारत जोडो व भारत जोडो न्याय यात्रेमुळे लोकसभा निवडणुकीत राज्यात काँग्रेस पक्षाला चांगलं यश मिळालं. पण विधानसभेची लढाई सोपी नाही. त्यामुळे गाफील राहू नका. महाराष्ट्राची निवडणूक देशासाठी महत्वाची असून, राज्यातील सत्ताबदलाचे हादरे दिल्लीलाही बसणार आहेत, असं प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले.

विधानसभा निडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी अमरावती इथं अमरावती व यवतमाळ जिल्ह्याची बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.

एसटी महामंडळ

मागील अनेक वर्षांपासून आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या एसटी महामंडळातील ३१ विभागांपैकी १८ विभागांनी जुलै महिन्यात नफा कमवला आहे. यंदा एप्रिल ते जुलै दरम्यान मागील वर्षीच्या तुलनेत १३१ कोटी रुपयांनी तोटा कमी झाला आहे.

पालकमंत्री डॉ.विजयकुमार गावित

भंडारा जिल्ह्यात पारंपारिक धान उत्पादनाला पर्याय म्हणून आणि शेतकऱ्यांना चांगले आर्थिक उत्पन्न मिळण्यासाठी शिंगाडा शेती हा पर्याय असून त्या शेतीसाठी आवश्यक ते प्रशिक्षण शेतकऱ्यांना देण्यात येईल. त्यावरील प्रक्रिया उद्योगासाठी प्रोत्साहन देण्यात येईल,असं पालकमंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी आज सांगितलं. पवनी तालुक्यातील खापरी रोड इथं बालाजी शिवरकर यांच्या शिंगाडा शेतीला त्यांनी भेट देऊन पाहणी केली. शिंगाड्याचे पीक व त्याची उपयुक्तता तसेच त्यापासून व्यावसायिक उत्पादने करण्यासाठीची प्रक्रिया याबाबत त्यांनी साकोली कृषी विज्ञान केंद्राच्या वरिष्ठ वैज्ञानिक डॉ.उषा डोंगरवार यांच्याशी चर्चा केली. आणि शेतकऱ्यांशी संवाद साधला.

हवामान

आज, उद्या आणि परवा विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये हवामान सामान्य राहणार आहे. या तीन दिवसात कोणताही सतर्कतेचा इशारा देण्यात आला नसून काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी अत्यंत हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, नागपूरसह अनेक ठिकाणी दुपारी पावसाच्या सरी कोसळल्या.

डेंगू-चिकनगुनिया

मलेरिया आणि हिवतापासोबत आता अकोला जिल्ह्यातील काही भागात मागील काही दिवसांपासून चिकनगुनियाच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने जिल्ह्यातील नागरिकांनी खबरदारी घ्यावी असं आवाहन आरोग्य विभागाच्या वतीनं करण्यात आलं आहे.

******